MHSO110016692015

| | |
|---|---|
| संचिका दाखल तारीख | २८/०४/२०१५ |
| संचिका नोंदणी तारीख | २८/०४/२०१५ |
| संचिका निकाल तारीख | १६/०६/२०२६ |
| कालावधी | १० व. ०९ म. ०६ दि. |

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, न्यायालय क्र. ३, माळशिरस,**
**जि. सोलापूर यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – जी. एम. बिरादार)**

**फौ.कि. अर्ज क्र. २६२/२०१५** **निशाणी क्र.** ६०

१. सौ. सोनाली संग्राम जानकर
वय – २८ वर्षे, धंदा – काही नाही,

२. कु. तनुजा संग्राम जानकर
वय – ०५ वर्षे,
अर्जदार नं. २ चे नजीकचे इष्टमित्र अर्जदार नं. १
आई सौ. सोनाली संग्राम जानकर
द्वारा – श्री. विजय गणपत धायगुडे
रा. एकशिव, ता. माळशिरस,
जि. सोलापूर **...अर्जदार**

**<u>वि रु द्ध</u>**

१. श्री. संग्राम महादेव जानकर,
वय – ३३ वर्षे, धंदा – शेती व व्यापार,

२. सौ. मंगल महादेव जानकर,
वय – ५५ वर्षे, धंदा – शेती व व्यापार,

३. श्री. महादेव नामदेव जानकर,
वय – ५५ वर्षे, धंदा – शेती व व्यापार,
सर्व रा. कुरभावी, ता. माळशिरस, जि. सोलापूर **...गैर अर्जदार**

**महिलांचे घरगुती छळापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम १२ प्रमाणे अर्ज**

---

**अर्जदारातर्फे वकील – श्री. एस. एस. कुलकर्णी**
**गैर अर्जदारांतर्फे वकील – श्री. एम. व्ही. वाघमोडे**

---

**न्या य नि र्ण य**
**(घोषित दिनांक १६/०६/२०२६)**

१. प्रस्तुतचा अर्ज कौटुंबीक हिंसाचारापासुन महीलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल केला आहे.

**या प्रकरणाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ संग्राम यांचे लग्न दि. ०५/०१/२००९ रोजी हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे व जातीरिवाजाप्रमाणे मौजे शिंदेवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे गणेशमंदिरात झाले होते. लग्नाचा संपूर्ण मानपानासह खर्च अर्जदार यांच्या आई वडिलांनी केला आहे. लग्नाचे वेळी अर्जदार यांच्या वडिलांनी गैरअर्जदार क्र. १ यांस संपूर्ण मानपान लग्नाचा संपूर्ण खर्च संसारोपयोगी वस्तु देवुन मानपानासह खर्च केला आहे. गैरअर्जदार क्र. १ संग्राम हे अर्जदार यांचे पती, गैरअर्जदार क्र. २ मंगल ही सासू व गैरअर्जदार क्र. ३ महादेव हे सासरे आहेत. गैरअर्जदार यांचे एकत्र कुटूंब आहे. अर्जदार नं. २ तनुजा ही अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ची मुलगी आहे. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदार क्र. १ कडे नांदणेस मौजे कुरभावी, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे नांदणेस गेली असता गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला सुरुवातीचे २ ते ४ महिने कसेबसे नांदविले. त्यानंतर मात्र गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे काहीही चुक नसताना कोणतेही कारण काढून विनाकारण छळजाचहाट मारहाण करु लागले, त्यांना उपाशी पोटी ठेवु लागले. तरीही अर्जदार सामनेवाल्यांकडे व्यवस्थित व चांगल्या प्रकारे नांदत असताना सामनेवाल्यांकडे नांदत असताना अर्जदार क्र. २ तनुजा ही मुलगी झाली. परंतु त्यांचे वागणेत कसलाच बदल न होता उलट अर्जदार हिला मुलगी झाली म्हणुन गैरअर्जदार हे त्यांना जास्तच त्रास देवू लागले. तसेच लग्नात जादा हुंडा दिला नाही, निट मानपान केला नाही, पाच तोळे सोने घालायला पाहिजे होते ते तीन तोळे घातले असे म्हणुन त्रास, छळजाचहाट करु लागले व त्यांना माहेरी हाकलुन देवु लागले. प्रत्येक वेळी त्यांना वडील, चुलत भाऊ, मामा नांदणेस नेऊन सोडत होते व गैरअर्जदार नं. १ ते ३ यांची समजुत काढत होते. अर्जदार सामनेवाल्यांकडे नांदत असताना त्यांना ध्रुव नावाचा मुलगा झाला. त्यांचे दोन्ही ही डिलेव्हरीचा खर्च त्यांचे आई वडीलांनी केला. मुलाचे जन्मानंतर तरी सामनेवाल्यांचे वागणेत

फरक पडेल असे त्यांना वाटले. परंतु त्यांचे वागणेत कसलाही फरक पडला नाही. अर्जदार हे सामनेवाल्यांकडे नांदत असताना सप्टेंबर २०१३ मध्ये गैरअर्जदार यांना पैशाची गरज असताना ते तिला म्हणाले तुझ्या वडिलांना फोन करुन त्यांचेकडून आपल्याला रु. ३०,०००/– मागुन घे, आपल्याला पैशाची गरज आहे. तेव्हा अर्जदार गैरअर्जदार यांना म्हणाले की, ''माझे वडिलांकडे पैसे नाहीत, त्यांचेकडून मिळणार नाहीत'' असे म्हणाल्यानंतर गैरअर्जदार नं. १ ते ३ व गैरअर्जदार नं. १ चा भाऊ तिला म्हणाले "तु जर तुझे माहेरहून पैसे आणत नाही तर तुझी थोरली जाऊ उषाची गत कशी केली तशी तुझी करु, तुला तिच्यागत मारुन टाकु" असे म्हणुन तिला दि. २६/०९/२०१३ रोजी माहेरी हाकलुन दिले व खोटया नाटया स्वरुपाचा माळशिरस येथील मे. सिव्हील जज्ञ सि. डी. सा‍ेा यांचे कोर्टात एच. एम. पी नं. ९८/२०१३ हा दाखल केला. त्यामध्ये चांगले नांदवितो असे म्हणुन तिला नांदणेस घेवुन गेले. उलट ते तिला आणखी म्हणु लागले किराणा दुकान आणखी वाढविणेचे आहे. त्यासाठी तुझे बापाकडून रु.२,००,००/– (दोन लाख) आण नाही तर सोडचिठ्ठी दे म्हणुन त्रास छळजाच हाट करु लागले. अंगावरील सर्व दागिने काढून घेवुन तिला मुलांसह माहेरी हाकलून दिले व ता. २३/०४/२०१५ रोजी सायं. ८.३० वाजता गैरअर्जदार नं. १ व २ हे तिच्या माहेरी आले व तिला म्हणाले सोडचिठ्ठी दे, असे म्हणुन त्यांनी तिला मारहाण केली व मुलगा धनराज यांस घेवुन गेले. त्याबद्दल ती नातेपुते पोलिस स्टेशनला त्याच दिवशी मारहाण केलेबद्दल फिर्याद दिली. ती फिर्याद एन.सी.नं.२२९/२०१५ ने नातेपुते पोलिसांनी नोंदवुन घेतली आहे. कसलेही योग्य व न्याय कारण नसताना गैरअर्जदार नं. १ याने अर्जदार व अर्जदार नं. २ तनुजा यांचा त्याग करुन तिला नांदविणेस व संभाळणेस स्पष्ट नकार दिला आहे. तिला उत्पन्नाचे, उपजिविकेचे कसलेही साधन नाही. ती तिच्या माहेरी धर्मार्थी जिवन जगत आहे. ती तिचे दैनंदिन खर्च उदरनिर्वाह करु शकत नाही. तसेच अर्जदार नं. २ चा सांभाळ करु शकत नाही. त्यांची सतत उपासमार होत तसेच तिला राहणेसाठी घर नाही. तसेच अर्जदार नं.२ हिचे शिक्षणाचा खर्च सुध्दा तिला करावे लागते. गैरअर्जदार नं. १ ते ३ हे मजेत राहत आहेत. गैरअर्जदार नं. १ ते ३ यांनी तिचा शारिरीक मानसिक छळजाचहाट केला आहे. तिला उपाशीपोटी ठेवले आहे. गैरअर्जदार यांना वार्षिक उत्पन्न ५ ते ६ लाख मिळते. गैरअर्जदार यांना आर्थीक मदत देणेचे आदेश पारीत करणेत यावे म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. उपरोक्त कथनांस अनुसरुन अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या कलम १८ नुसार संरक्षण आदेश, कलम १९ नुसार निवासाबाबत आदेश, कलम २० नुसार आर्थिक दिलासा देण्याबाबत आदेश आणि कलम २२ नुसार नुकसानभरपाई देण्याबाबत आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे. तिने उत्पन्नाच्या झालेल्या नुकसानाबाबत रक्कम रु. ५,००,०००/–, अन्न वस्त्र, औषध किंवा इतर मुलभूत गरजांसाठी पोटगी म्हणून दरमहा रु. ५,०००/–, अर्जदार क्र. २ हिस दरमहा रक्कम रु. ३,०००/– पोटगी देणेबाबत, घरभाडे

म्हणून दरमहा रु. ३,०००/– एवढ्या रकमेची मागणी केली आहे.

**<u>गैरअर्जदारांची कथने</u> –**

४. गैरअर्जदारांनी प्रस्तुत प्रकरणात हजर होऊन निशाणी क्र. ०८ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले. त्यांनी लग्न झाल्याची बाब आणि पक्षकारांमधील नातेसंबंध मान्य केले. परंतु, त्यांच्यावरील आरोप अमान्य केले. त्यांचे कथन असे आहे की, अर्जदाराच्या हट्टापायी दि. १७/०८/२०१४ रोजी रविवारी कुरबावी येथील आपल्या शेतातील वस्तीवर आई वडिलांपासुन विभक्त राहण्यास गेले. सध्या गैरअर्जदार क्र. १ हे त्यांच्या आई वडिलांपासुन म्हणजेच गैरअर्जदार क्र. २ व ३ पासुन वेगळे रहात असल्यामुळे गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी छळ करण्याचा जाचहाट करण्याचा किंवा उपाशीतापाशी ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अर्जदार ही शिलाई मशिनचे काम व क्लास घेते. त्यातुन दरमहा तिला रु. १०,०००/– उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र. १ हा १० वी नापास असुन मोलमजुरी करुन शेतात मिळेल ते काम करुन उदरनिर्वाह करीत आहेत. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ यास तिच्या माहेरी एकशिव येथे राहण्यास जाण्याच्या हट्टापायी अर्जदार हिने स्वतः हुन गैरअर्जदार नं. १ चा त्याग केलेला आहे. त्यामुळे तिला पोटगी मागणेचा तसेच नुकसानभरपाई मागण्याचा कोणताही अधिकार नाहीव तशी कायद्याने तिला पोटगी अर्जदार नं. १ हिस मिळु शकत नाही. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिस लग्नानंतर पासुन आाजपर्यंत चांगल्याप्रकारे नांदवत असुन, आजही नांदविण्यास तयार आहे.

५. अर्जदार नं. १ व गैरअर्जदार क्र. १ हे दोघेच राहत असल्यामुळे तिला कोणत्याही प्रकारचा त्रास जाचहाट वगैरे काहीही नव्हते. अर्जदार नं. १ हिस कोणत्याही प्रकारचा त्रास नसताना अर्जदाराच्या आई पोर्णिमाचा फोन आल्यानंतर दि. २६/०९/२०१३ रोजी कसलेही कारण नसताना अर्जदार नं. २ चा भाऊ सुरज धायगुडे यांच्या बरोबर एकशिव येथे माहेरी निघुन गेले असता गैरअर्जदार नं. १ येणे ''तु माहेरी जावु नकोस'' म्हणुन विरुध्द केला असता सुरज धायगुडे याने गैरअर्जदार क्र. १ यास घाणेरडया व अव्याच भाषेत शिवीगाळ करुन अपमान करुन अर्जदार क्र. १ व २ हीस घेवून निघुल गेला. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिस नांदविण्यास तयार आहे. या सर्व कथनांसह गैरअर्जदारांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. अर्जदारातर्फे विधिज्ञ व गैरअर्जदारांतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे व त्यावरील दोन्ही बाजूंच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंच्या कथनांचा विचार करता माझ्या विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष, कारणमिमांसेसह, मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हीने हे शाबीत केले आहे काय की, ती व्यथीत व्यक्ती आहे व गैर अर्जदारांनी तिच्यावर कौटुंबीक हिंसाचार केलेला आहे? | गैरअर्जदार क्र. १ यांच्या हद्दीपर्यंत होकारार्थी |
| २. | अर्जदार हिने शाबीत केले आहे काय की, ती कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या कलम १८ नुसार संरक्षणात्मक आदेश मिळविण्यास पात्र आहे? | होकारार्थी |
| ३. | अर्जदार हिने शाबीत केले आहे काय की, ती कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या कलम १९ नुसार निवासाबाबत आदेश मिळविण्यास पात्र आहे? | अंशतः होकारार्थी |
| ४. | अर्जदार हिने शाबीत केले आहे काय की, ती गैरअर्जदारकडून कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या कलम २० नुसार पोटगी मिळणेस पात्र आहे? असल्यास किती? | अंशतः होकारार्थी. अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु. २,५००/- तसेच अर्जदार क्र. २ हिला दरमहा रु. २,५००/- |
| ५. | अर्जदार हिने शाबीत केले आहे काय की, ती गैरअर्जदारकडून कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या कलम २० व २२ नुसार नुकसानभरपाईचा खर्च मिळण्यास पात्र आहे? | अंशतः होकारार्थी |
| ६. | अंतीम आदेश काय? | अंशतः मंजूर करण्यात येते. |

## <u>का र ण मि मां सा</u>

७. अर्जदारातर्फे तिच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ एकूण २ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र. १ ही स्वतः अर्जदार आहे (निशाणी क्र. १३) व साक्षीदार क्र. २ विजय गणपत धायगुडे (निशाणी क्र. १८) हा आहे. अर्जदार क्र. १ हिने मालमत्ता व दायित्वबाबत प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ५८ वर दाखल केले आहे.

८. त्याउलट, सामनेवालांतर्फे त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ एकूण ६ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र. १ संग्राम महादेव जानकर हा आहे (निशाणी क्र. २१), साक्षीदार क्र. २ सुधाकर हरीभाऊ धायगुडे हा आहे (निशाणी क्र. २२). साक्षीदार क्र. ३ भगवान बापुराव रुपनवर हा आहे (निशाणी क्र. २६), साक्षीदार क्र. ४ अप्पासो भगवान रुपनवर (निशाणी क्र. २७), साक्षीदार क्र. ५ मारुती बाबुराव खताळ (निशाणी क्र. ३५), साक्षीदार क्र. ६ निता विजय कटयारे (निशाणी क्र. ४१) यांना तपासले आहे.

९. दोन्ही बाजूंनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ बरीचशी कागदपत्रे दाखल केली आहेत. संक्षेप व सोयीखातर ती कागदपत्रे योग्य ठिकाणी चर्चिली जातील.

**मुद्दा क्र. १ बाबत –**

१०. प्रस्तुत अर्जात यशप्राप्तीसाठी अर्जदारास सामनेवालांनी तिच्याविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार केला असल्याचे सिद्ध करणे आवश्यक होते. त्याबाबत तिच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

११. साक्षीदार क्र. १ म्हणजेच अर्जदाराने निशाणी क्र. १३ वरील पुराव्याच्या शपथपत्रात तिने गैरअर्जदार क्र. १ याने म्हणजेच तिच्या पतीने तिला मारहाण केल्याबाबतच्या आणि तिची आर्थिक हेळसांड केल्याबाबतच्या तिच्या कथनांचा पुनरोच्चार केला आहे. ती कथने गैरअर्जदार अर्जदाराच्या उलटतपासादरम्यान आव्हानित केली. परंतु, त्यातून अर्जदाराने त्याबाबत खोटे कथन केल्याचे दर्शविणारे काहीही निष्पन्न झाले नाही. याठिकाणी हेही नमूद करणे आवश्यक आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्यामध्ये नेहमी वाद होत असल्याची बाब गैरअर्जदारांना मान्य आहे. अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या दोन्ही बाजूंनी एकमेकांना वकिलांमार्फत पाठविलेल्या कायदेशीर नोटीशीमधून दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आरोप केले असल्याचे स्पष्ट दिसते. त्याचबरोबर अभिलेखावर दाखल असलेल्या लेखी हमीपत्रांमधून दोन्ही बाजूंनी त्यांचे वाद सामोपचाराने मिटविण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसते. अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या अदखलपात्र अपराधाच्या नोंदीवरुन हेही दिसते की, दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध फौजदारी स्वरुपाच्या तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल केले आहेत. या सर्व कागदपत्रांवरुन दोन्ही बाजूंमध्ये कौटुंबिक स्वरुपाचा वाद असल्याचे स्पष्ट दिसते. अशा परिस्थितीत मारहाणीसारख्या घटनांबाबत अर्जदाराच्या कथनांवर अविश्वास दाखविण्यासाठी कोणतेही कारण दिसून येत नाही. याबाबत गैरअर्जदारचे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदाराने तथाकथित मारहाणीबाबतच्या कोणत्याही प्रसंगाची तारीख अभिलेखावर आणलेली नाही. परंतु, येथे हे नमूद करणे आवश्यक आहे की, अर्जदाराचे लग्न सन २००९ मध्ये झालेले असून प्रस्तुतचा अर्ज सन २०१५ मध्ये दाखल करण्यात आला

आहे. अर्जदाराच्या कथनानुसार, लग्नाच्या ४ ते ५ महिन्यानंतरपासूनच अर्जदारास कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांना सामोरे जावे लागत आहे. तिच्या कथनानुसार, सन २०१५ पर्यंत गैरअर्जदारांनी तिला त्रास दिलेला आहे. अशा परिस्थितीत कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रत्येक घटनेची तारीख लक्षात ठेवण्याची अपेक्षा अर्जदाराकडून करता येणार नाही. त्यामुळे असेच म्हणावे लागेल की, गैरअर्जदारच्या विधिज्ञांच्या युक्तीवादामध्ये तथ्य दिसून येत नाही. अर्जदाराच्या एकंदर कथनांचा आणि पुराव्याचा विचार करता असे दिसते की, तिच्या पुराव्यातून कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या कलम ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येतील महत्त्वाचे घटक सिद्ध झालेले आहेत.

१२. प्रस्तुत प्रकरणात कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सिद्ध करण्याबरोबरच गैरअर्जदार हे अर्जदारासोबत कौटुंबिक नातेसंबंधात राहिल्याचे देखील सिद्ध करणे अर्जदाराच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्याबाबतदेखील अभिलेखावरील पुरावा पडताळून पाहणे आवश्यक आहे.

१३. त्याबाबत गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे सर्व अर्जदारासोबत सामाईक घरात राहिले किंवा कसे, याबाबतचा पुरावा पडताळून पाहणे आवश्यक आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराचा पती व गैरअर्जदार क्र. २ ही तिची सासू आहे. अर्जदार त्या दोघांसोबत सामाईक घरात राहिल्याचे दोन्ही बाजूंना मान्य आहे. परंतु, अर्जदाराच्या हट्टापायी दि. १७/०८/२०१४ रोजी रविवारी कुरबावी येथील आपल्या शेतातील वस्तीवर आई वडिलांपासुन विभक्त राहण्यास गेले. सध्या गैरअर्जदार क्र. १ हे त्यांच्या आई वडिलांपासुन म्हणजेच गैरअर्जदार क्र. २ व ३ पासुन वेगळे रहात असल्यामुळे गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी छळ करण्याचा जाचहाट करण्याचा किंवा उपाशीतापाशी ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याने हेही कबूल केले आहे की, गैरअर्जदार क्र. २ व ३ या त्यांच्या लग्नापासून अर्जदारासोबत सामाईक घरात कधीही राहिल्याचे अर्जदाराचे कथन आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदारासोबत कौटुंबिक नातेसंबंधात राहिले, असे म्हणता येते.

१४. अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी मानसिक छळ केला, घरातुन हाकलुन दिले असे कथन केले आहे. अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १ व २ या दोघांनीही त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रात त्याबाबत कथन केले आहे. ही बाब सामनेवालांनी त्यांच्या लेखी म्हणण्यात नाकारली असली तरी सदर साक्षीदार क्र. १ व २ यांच्या उलटतपासात मात्र गैरअर्जदार यांनी ती कथने खोटी असल्याबाबतची कोणतीही सुचना अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १ व २ यांना केली नाही. गैरअर्जदारतर्फे साक्षीदार क्र. १ व २ या त्यांच्या शपथपत्रात असे कथन केले आहे की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्या राहण्याच्या कारणावरुन वाद होते. विधीज्ञ नरुटे यांनी गैरअर्जदार क्र. १ मार्फत अर्जदार हिला नांदण्यास येणासाठी नोटीस पाठविली होती.

१५. अ.सा.क्र. २ सुधाकर हरीभाऊ धायगुडे ही अर्जदाराचा भाऊ आहे. त्याने अर्जदाराच्या पुराव्याला सुसंगत असा पुरावा दिलेला आहे. या सर्व बाबींचा विचार करता असे दिसते की, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्यासोबत त्यांच्या घरात सामाईकरित्या राहिल्याचे सामनेवालांनी अप्रत्यक्षरित्या मान्य केले आहे. त्यामुळे असेच म्हणावे लागेल की, गैरअर्जदार क्र. १ यांच्याव्यतिरिक्त गैरअर्जदार क्र. २ व ३ हेदेखील अर्जदारासोबत कौटुंबिक नातेसंबंधात राहिल्याचे अर्जदाराच्या पुराव्यातून सिद्ध होते.

१६. गैरअर्जदारांचे साक्षीदार क्र. २ यांच्या साक्षीत असे आले आहे की, त्यांची पिठाची चक्की, किराणा दुकान आहे. गैरअर्जदारांचे सा. क्र. ३ भगवान बापुराव रुपनवर हे तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष आहेत व सा. क्र. ४ हे अप्पसो भगवान रुपनर हे तंटामुक्ती समितीचे ६ वर्षापासून अध्यक्ष होते. त्यांनी त्यांच्या साक्षीत अर्जदार व गैरअर्जदार यांचे वाद होते. तसेच अर्जदारांनी गैरअर्जदार यांच्याविरुध्द तक्रारी अर्ज दाखल केल्याचे त्यांच्या साक्षीत कथन केले आहे. सदर अर्ज नि. क्र. २७ व ३० वर आहे.

१७. गैरअर्जदारांचे साक्षीदार क्र. ५ मारुती बाबूराव खताळ यांनी गैरअर्जदार यांच्या साक्षीस पूरक अशी साक्ष दिली नाही. गैरअर्जदारांचे साक्षीदार क्र. ६ निता विजय कटयारे यांनी असे कथन केले आहे की, धनराज याच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च गैरअर्जदार क्र. १ संग्राम जानकर हे करतात. त्याअनुषंगाने नि. क्र. ३६ वर बोनाफाईड दाखल केले आहे. नि. क्र. ३७ व ४२ वर पावत्या दाखल करण्यात आल्या आहेत.

१८. या सर्व बाबींचा विचार करता असेच म्हणावे लागेल की, गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदारासोबत कौटुंबिक नातेसंबंधात राहिल्याचे व गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदाराने सिद्ध केले आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर गैरअर्जदार क्र. १ पुरते होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत –</u>**

१९. या आधी कथन केल्याप्रमाणे अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या कलम १८ नुसार संरक्षण आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे. निशाणी क्र. १० वरील संरक्षण अधिकाऱ्याने कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या कलम १२ अन्वये दाखल केलेल्या अर्जात सदर कायद्याच्या कलम १८ अंतर्गत कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांची पुनरावृत्ती करण्यापासून प्रतिबंध करणे, शाळा/महाविद्यालय/कामाच्या ठिकाणी प्रवेश करण्यापासून प्रतिबंध करणे, अर्जदारासोबत संपर्क साधण्यास प्रतिबंध करणे आणि मिळकतींचे हस्तांतरण

करण्यापासून प्रतिबंध करणे इत्यादींबाबत आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे. परंतु, त्याबाबतच्या अर्जदाराच्या कथनांचा व पुराव्याचा विचार करणे आवश्यक आहे.

२०. अर्जदाराच्या कथनांचा आणि अभिलेखावरील पुराव्याचा एकंदर विचार करता असे दिसते की, गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या कामाच्या ठिकाणी अथवा तिच्या मुलांच्या शाळा/महाविद्यालयामध्ये प्रवेश करुन कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदाराचे कोणतेही कथन नाही. त्याचप्रमाणे गैरअर्जदार एकत्र कुटुंबाची मिळकत हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात असल्याचेदेखील अर्जदाराचे कोणतेही कथन नाही. त्यामुळे त्याबाबतचे आदेश पारीत करण्यासाठी कोणतेही संयुक्तीक कारण दिसून येत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ च्या होकारार्थी उत्तरास अनुसरुन केवळ कौटुंबिक हिंसाचारांच्या घटनांची पुनरावृत्ती करण्यापासून प्रतिबंध करणारा आदेश गैरअर्जदार क्र. १ ते ३ विरुद्ध पारीत करणे उचित होईल. या सर्व चर्चेस अनुसरुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u> –**

२१. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याच्या कलम १२ प्रमाणे दाखल केलेल्या अर्जात सदर कायद्याच्या कलम १९ नुसार अर्जदार यांना गैरअर्जदार ज्या ठिकाणी रहात आहे त्या राहत्या घरामध्ये अर्जदार हीस कायम स्वरुपी राहणेची व्यवस्था करण्यात यावी त्यास सामनेवाल्याची हारकत असलेस अर्जदार ही जिथे राहील त्याचे घरभाडे सामनेवाल्याने द्यावे व राहण्याची व्यवस्था करावी. अर्जदार ही ज्या घरजागेत राहील त्या घरजागेत गैरअर्जदारने अर्जदारास प्रवेश करणेपासून रोखू नये, हारकत अडथळा करु नये तसेच त्या संदर्भात इतर कोणतेही बेकायदेशीर कृत्य करु नयेत असे गैरअर्जदार विरुध्द प्रतिबंधात्मक आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

२२. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, अर्जदार ही गैरअर्जदारांसोबत सद्यस्थितीत सामाईक घरात राहत नसल्याची बाब दोन्ही बाजूंना मान्य आहे. अर्जदाराने तर तिच्या साक्षीतच ती गैरअर्जदारांसोबत नांदण्यासाठी तयार नसल्याचे कथन केले आहे. अर्जदार राहत असलेल्या घरात गैरअर्जदारांनी प्रवेश केल्याबाबत अर्जदाराने कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे त्याबाबत मनाई करणारा आदेश पारीत करण्यास कोणतेही संयुक्तीक कारण दिसून येत नाही. अर्जदार यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ याचे आहे. अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहते. त्यामुळे त्या निवासाबाबत आदेश पारीत करणे गरजेचे आहे.

२३. अर्जदाराच्या पुराव्यानुसार, गैर अर्जदार यांच्याकडून तिला शिवीगाळ व

मारहाण झाल्याचे सिद्ध होते. त्यामुळे अर्जदार ही गैर अर्जदारांसोबत एकत्र राहिल्यास त्यांच्यात वाद होण्याची शक्यत नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत, अर्जदार यांना गैरअर्जदारांसोबत एकत्र राहण्याचा आदेश पारित करणे संयुक्तिक नाही. अर्जदार क्र. १ तिच्या मुलीसोबत ही सध्या तिचे माहेरी राहते. त्यामुळे त्याच ठिकाणी तिच्या राहण्याची सोय करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व उचित आहे. अर्जदाराचा सांभाळ करण्याची जबाबदारी गैर अर्जदार क्र. १ याच्यावर आहे. त्यामुळे गैर अर्जदार क्र. १ याने राहण्यासाठी निवासाचा खर्च देणे त्याच्यावर बंधनकारक आहे. सबब, गैर अर्जदार क्र. १ याने अर्जदार यांना निवासासाठी दरमहा रु. २,०००/- द्यावेत. सबब, सबब मुद्दा क्र. ३ बाबत मी अंशतः होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत –</u>**

२४. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणात अन्न, कपडे, औषधोपचार आणि इतर प्राथमिक गरजेच्या वस्तूंसाठी दरमहा रु. ५,०००/-, अर्जदार क्र. २ हिस दरमहा रु. ३,०००/-, घरभाडेसाठी दरमहा रु. ३,०००/- दरमहा एकूण रु. ११,०००/- एवढ्या रकमेच्या पोटगीची मागणी केली आहे. तसेच नुकसानभरपाई म्हणून रु. ५,००,०००/- ची मागणी केली.

२५. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्यामधील पती-पत्नीचे नाते दोन्ही बाजूंना मान्य आहे. गैरअर्जदार क्र. १ याने त्याच्या उलटतपासात अर्जदारास कोणतीही पोटगी देत नसल्याचे मान्य केले आहे. अर्जदाराच्या व तिच्या मुलांच्या पालनपोषणाची कायदेशीर व नैतिक जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ ची आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारास पोटगी देण्यास जबाबदार आहे. परंतु, दरमहा पोटगीची रक्कम ठरविण्यासाठी दोन्ही बाजूंच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे.

२६. अर्जदाराच्या कथनानुसार, गैर अर्जदार क्र. १ ते ३ हे एकत्रात राहतात व शेतीतून वार्षिक ८ ते ९ लाख उत्पन्न कमवितात. गैरअर्जदार यांचे किराणा दुकान असून पिठाणी गिरणी आहे. अर्जदारातर्फे गैर अर्जदार यांच्या मालकीचे ७/१२ उतारे (निशाणी १५) दाखल करण्यात आले. त्यामध्ये गैरअर्जदार क्र. २ याच्या नावे जमीन असल्याची नोंद आहे. त्याचप्रमाणे सदरील जमिनीमध्ये विहीर असल्याचेदेखील नोंद आहे. त्यामुळे शेतीमधूनदेखील गैर अर्जदार यांना उत्पन्न मिळते, ही बाब सिद्ध होते.

२७. अर्जदाराने गैर अर्जदार क्र. १ याच्या नोकरीच्या उत्पन्नाबाबत तोंडी पुरावा दिलेला आहे. परंतु, त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. गैर अर्जदार क्र. १ हा ३३ वर्षे वयाचा आहे. त्यामुळे त्याला स्वतःचे निश्चितच उत्पन्न असणे अपेक्षीत आहे.

त्यामुळे त्याचे मासिक उत्पन्न किमान रु. १०,०००/– ग्राह्य धरणे गरजेचे आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यानुसार गैर अर्जदार क्र. १ याला शेतीमधून उत्पन्न मिळते हेदेखील सिद्ध होते. अर्जदार ही गैर अर्जदार क्र. १ याची पत्नी व अर्जदार क्र. २ ही गैरअर्जदार क्र. १ ची मुलगी आहे. त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ याच्यावरच आहे. अर्जदाराच्या पुराव्यानुसार, त्यांच्या उदरनिर्वाहाची तरतूद गैरअर्जदार यांनी केलेली नसल्याचे तसेच गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे सिद्ध झालेले आहे. अशा परीस्थीतीत गैरअर्जदार व अर्जदार यांच्या राहणीमानाचा व गैरअर्जदार याच्या उत्पन्नाचा विचार केला असता न्यायाच्या दृष्टीने अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु. २,५००/–, अर्जदार क्र. २ हिस दरमहा रु. २,५००/–, घरभाडेसाठी दरमहा रु. २,०००/– दरमहा एकूण रु. ७,०००/– एवढी रक्कम पोटगी मंजूर करणे उचित व न्यायाचे आहे. सबब मुद्दा क्र. ४ बाबत मी अंशतः होकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ५ बाबत –**

२८. अर्जदार हिने गैर अर्जदार यांच्याकडून तिला झालेल्या आर्थिक, मानसिक व शारिरीक छळापोटी एकूण रु. ५,००,०००/– ची नुकसान भरपाई मंजूर करण्याची विनंती केलेली आहे. परंतु, गैर अर्जदारांचे उत्पन्न लक्षात घेता सदरील मागणी अवाजवी आहे. अशा परिस्थितीत, गैर अर्जदार व अर्जदार यांच्या राहणीमानाचा व गैरअर्जदार याच्या उत्पन्नाचा विचार केला असता अर्जदाराला झालेल्या नुकसानीबाबत, विवाहातील इतर खर्च यासाठी एकत्रीतरित्या रु. ५०,०००/– गैर अर्जदार क्र. १ याच्याकडून मंजूर करणे उचित व न्यायाचे आहे. सबब, मुद्दा क्र. ५ करिता मी अंशतः होकारार्थी नोंदवत आहे.

२९. मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी तसेच मुद्दा क्र. ३ ते ५ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदविण्यात आले आहे. मुद्दा क्र. १ च्या होकारार्थी उत्तरान्वये गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदारास कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे अर्जदारास प्रस्तुत प्रकरणात वकिलांची नेमणूक करुन अर्जाचे कामकाज चालविणे भाग पडले आहे. त्यामुळे अर्जाचा खर्च म्हणून अर्जदारास रु. १,०००/– (एक हजार रुपये) एवढी रक्कम गैरअर्जदार क्र. १ याच्याकडून देवविणे न्यायोचित ठरेल. त्यास अनुसरुन न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. गैर अर्जदार क्र. १ यांना असा आदेश देण्यात येते की, अर्जदाराविरुद्ध कौटुंबिक

हिंसाचाराच्या व्याख्येत मोडेल असे कोणतेही कृत्य यापुढे करण्यापासून प्रतिबंधित करण्यात येत आहे.

३. गैर अर्जदार क्र. १ संग्राम महादेव जानकर याला असा आदेश देण्यात येतो की, त्याने अर्जदार हिला घरभाडे म्हणून दरमहा रु. २,०००/- (दोन हजार रुपये) अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक २८/०४/२०१५ पासून द्यावेत.

४. गैर अर्जदार क्र. १ संग्राम महादेव जानकर याला असा आदेश देण्यात येतो की, त्याने अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु २,५००/- (दोन हजार पाचशे रुपये) तसेच अर्जदार क्र. २ हिला सज्ञान होईपर्यंत दरमहा रु २,५००/- (दोन हजार पाचशे रुपये) पोटगी म्हणून अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक २८/०४/२०१५ पासून द्यावेत.

५. गैरअर्जदार क्र. १ संग्राम महादेव जानकर याला असा आदेश देण्यात येतो की, त्याने अर्जदार यांना नुकसान भरपाई खर्च म्हणून रु. ५०,०००/- (पंन्नास हजार रुपये) द्यावेत.

६. गैरअर्जदार क्र. १ संग्राम महादेव जानकर याला असा आदेश देण्यात येतो की, त्याने अर्जदार यांना अर्जाचा खर्च म्हणून रु. १,०००/- (एक हजार रुपये) द्यावेत.

६. गैरअर्जदार यांनी त्यांच्या मिळकती गहाण, दान अगर त्याचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये, अशी अर्जदाराची विनंती नामंजूर करण्यात येते.

७. या न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार तसेच संरक्षण अधिकारी व नातेपुते पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना विनामुल्य देण्यात यावी.

*न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात थेट संगणकावर टंकलिखीत करुन जाहीर केला.*

Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.06.16 13:17:32 +0530

दिनांक – १६/०६/२०२६

**(जी. एम. बिरादार)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, माळशिरस.

## ***CERTIFICATE***

I affirm that the contents of this PDF file/order is same word to word as per the original order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | P. S. Kore (Grade III) |
| b) | Court | : | 3rd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Malshiras. |
| c) | Order signed by P.O. on | : | 16/06/2026 |
| d) | Order uploaded on | : | 16/06/2026 |